# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रा निआ/२०१६/प्र.क्र.३६/का-३/रोख शाखा
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३/०५/२०१६

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाकडून राजकीय पक्षांची नोंदणी करण्यात येते. पक्षांकडून नोंदणी शुल्क, दंड आकारण्यात येतो व ही रक्कम प्रथमपासूनच "८४४३-नागरी ठेवी-८०० इतर ठेवी, (३) महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे जमा केलेला निधी (८४४३ ५४२१)" या लेखाशीर्षाखाली कोषागारात जमा करण्यात येत आहे. तथापि, ही रक्कम उपरोक्त खात्यामध्ये जमा करण्याचे औपचारीक आदेश असल्याचे आढळून येत नाहीत.

या अनुषंगाने आता असे आदेश देण्यात येत आहेत की, राजकीय पक्ष नोंदणीपोटी राज्य निवडणूक आयोगाकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काची रक्कम तसेच दंडाच्या व राजकीय पक्षांना आकरण्यात येणाऱ्या अन्य रकमा पूर्वीप्रमाणे "८४४३-नागरी ठेवी-८०० इतर ठेवी, (३) महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे जमा केलेला निधी (८४४३ ५४२१)" या लेखाशीर्षाखाली ठेव खात्यात जमा करण्यात यावी.

(ज.स.सहारिया),
राज्य निवडणूक आयुक्त
महाराष्ट्र.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
३. लेखाधिकारी, भारतीय रिजर्व बँक, फोर्ट, मुंबई.
४. संचालक लेखा व कोषागारे, लेखा व कोषागारे संचालनालय,मुंबई